ePaper “श्रीराम मांसाहारी...”, जितेंद्र आव्हाडांच्या विधानानंतर अजित पवार गटाचे आंदोलन



| वर्ष - 7 | अंक - 235 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत


- पहिल्याच दिवशी २३ विकेट्स!
- अंकितानं केला मंदिराचा अपमान
- अनेकवेळा वनवास भोगावा लागतो!
- श्रीराम मांसाहारी असल्याचे वक्तव्य!


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 4 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## संसदेतील खासदार निलंबन विरोधात

# ‘निर्भय बनो’ अभियान!

### » पिंपरी-चिंचवडमधील विरोधी पक्ष एकवटले

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायांच्या अधिकारांचा संकोच, शेतकऱ्यांच्या वाढणाऱ्या आत्महत्या, दलितांवरील अत्याचार इत्यादी मूलभूत प्रश्नांकडे जनतेचे लक्ष जाऊ नये, म्हणून नको ते मुद्दे पुढे करून सर्वसामान्य लोकांना गुंतवून ठेवण्याचे षडयंत्र सुनियोजित पद्धतीने केले जात आहे. संसदेमध्ये मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या खासदारांना असंविधानिक पद्धतीने निलंबित केले जात आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी 6 जानेवारी रोजी ‘निर्भय बनो’ अभियानांतर्गत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**





बुधवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माजी आमदार अॅड. गौतम चाबुकस्वार, काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, मारुती भापकर तसेच ज्येष्ठ नेते प्रताप गुरव, प्रकाश जाधव, चेतन बेंद्रे, गणेश दराडे, नरेंद्र बनसोडे, डॉ. मनीषा गरुड, अनिल रोहम, धनाजी येळकर, सतीश काळे, प्रदीप पवार, प्रवीण कदम, रवी नांगरे, सागर चिंचवडे आदी उपस्थित होते.

6 जानेवारी रोजी सायंकाळी 6 वाजता पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी व अॅड. असीम सरोदे यांच्या निर्भय बनो’ अभियानांतर्गत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.‘अशी माहिती संयोजक व ज्येष्ठ नेते मानव कांबळे यांनी पत्रकार परिषदेतील दिली.

आम आदमी पार्टीचे चेतन बेंद्रे यांनी सांगितले की, लाखो शहिदांच्या बलीदानातून मिळालेले स्वातंत्र्य धोक्यामध्ये आलेले असतांना, आज जर आपण शांत राहिलो तर येणाऱ्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. यासाठीच प्रबोधन करण्याच्या उद्देशाने ‘निर्भय बनो’ अभियानाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर किंबहुना देशभर एक चळवळ उभी करण्यात आली आहे.

> “ सरकारी यंत्रणांचा वापर करून देशातील विरोधी पक्ष संपवण्याची प्रक्रिया बिनदिक्कतपणे सुरू आहे. सरकारच्या जन विरोधी धोरणांविरुद्ध बोलणाऱ्यांना किंवा लिहिणाऱ्यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली जेलमध्ये टाकले जात आहे. अशा परिस्थितीमध्ये समाजातील बुद्धिजीवी, विचारवंत व सामाजिक जाणीव असणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना, पक्ष यांनी शांत राहून चालणार नाही. निर्भय होऊन या व्यवस्थेच्या विरोधात संघटितपणे लढा उभारला पाहिजे. यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले आहे.
> **-संजोग वाघेरे, नेते,** शिवसेना उबाठा.



# अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी आमदार लांडगे सरसावले!

### » आयुक्तांना सूचना : विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्याची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनातील सहशहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांची विभागीय पदोन्नती समितीची (डीपीसी) बैठक घ्यावी व पुढील कार्यवाही करावी, अशी सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**




याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मुख्य अभियंता यांची विभागीय पदोन्नती समितीची बैठक (डीपीसी) झाली होती. त्यानंतर सहशहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता, उपाभियंता यांची डीपीसी होणे अपेक्षीत होते. मात्र, झालेली नाही. तसेच, संबंधितांना त्या-त्या विभागाचा चार्जही दिलेला नाही. महापालिका सेवेतील काही कार्यकारी अभियंता व उपअभियंता सेवा निवृत्त झाले आहेत. त्यामुळे सह शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या जागा रिक्त आहेत. कामाची व्याप्ती व कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सदरच्या जागा भरणे आवश्यक आहे. सदर अधिकाऱ्यांची डीपीसी आणि पुढील कार्यवाही करावी, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली आहे.

> “ पिंपरी- चिंचवड शहराची लोकसंख्या सध्या ३० लाखांच्या घरात आहे. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेवरती विकास कामे आणि प्रकल्पांचा प्रचंड ताण आहे. महापालिका कारभारातील सुसूत्रता आणि गतिमानता या दृष्टिकोनातून रिक्त पदांवरती तात्काळ अधिकारी नियुक्त करणे आणि त्यांना जबाबदारींचे वाटप करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने विभागीय पदोन्नती समितीची बैठक घ्यावी व पुढील कार्यवाही करावी अशी सूचना केली आहे.
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा. भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# बेकायदा बांधकामांची झाडाझडती!

## फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करणार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा अकरा इमारतींवर कारवाई केल्यानंतर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधाकामांना दिलेल्या नोटिशी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मागविला आहे. त्यासाठी नगर अभियंता आणि अतिरिक्त आयुक्तांची समिती स्थापन करण्यात आली असून, पुढील आठवड्यात या सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यात येणार आहे.**



तर ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर महापालिका गुन्हे दाखल करणार आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा ११ इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. बेकायदा बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजाविण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधकामांना बजाविण्यात आलेल्या नोटिशींची माहिती मागविण्यात आल्याचे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंगळवारी सांगितले. अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांची समिती नेमण्यात आली आहे. या समितीकडून गेल्या तीन वर्षांत किती बांधकामांना नोटिसा दिल्या गेल्या आहेत, याची माहिती घेतली जाणार आहे. त्याचा अहवाल ही समिती १२ जानेवारीपर्यंत सादर करणार आहे. त्यानंतर आढावा घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. तसेच फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे कुमार यांनी सांगितले. सदनिका खरेदी करताना रेरा आणि महापालिकेच्या संकेतस्थळावरून बांधकामाला परवानगी आहे का, याची माहिती घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी महापालिकेकडून शहरातील अधिकृत बांधकाम व्यावसायिकांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे, महापालिकेचे कामकाज १०० टक्के ऑनलाइन केले जाणार आहे. सध्या महापालिकेच्या ६० पैकी १६ विभागांचा कार्यभार ऑनलाइन करण्यात आला असून, येत्या दोन महिन्यांत उर्वरित सर्व विभागांचा कारभार ऑनलाइन केला जाणार असून, प्रकरणांची माहिती नागरिकांना मिळणार आहे. तर ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर महापालिका गुन्हे दाखल करणार आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा ११ इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. बेकायदा बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजाविण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधकामांना बजाविण्यात आलेल्या नोटिशींची माहिती मागविण्यात आल्याचे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंगळवारी सांगितले. अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांची समिती नेमण्यात आली आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा अकरा इमारतींवर कारवाई केल्यानंतर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधाकामांना दिलेल्या नोटिशी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मागविला आहे.

### महापालिकेचे कामकाज ऑनलाइन

» ६० पैकी १६ विभागांचा कार्यभार ऑनलाइन करण्यात आला असून, येत्या दोन महिन्यांत उर्वरित सर्व विभागांचा कारभार ऑनलाइन केला जाणार असून, प्रकरणांची माहिती नागरिकांना मिळणार आहे.तर ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर महापालिका गुन्हे दाखल करणार आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा ११ इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. बेकायदा बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजाविण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नव्हती. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा अकरा इमारतींवर कारवाई केल्यानंतर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधाकामांना दिलेल्या नोटिशी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मागविला आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधकामांना बजाविण्यात आलेल्या नोटिशींची माहिती मागविण्यात आल्याचे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंगळवारी सांगितले. अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांची समिती नेमण्यात आली आहे.

---

# बेळगावमध्ये रंगणार राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धा!

## आजपासून स्पर्धेला सुरुवात : पुरुष- महिला 38 संघांचा समावेश

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**भारतीय रोल बॉल महासंघ व कर्नाटक रोल बॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २० व्या वरिष्ठ राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धेचे आयोजन, बेळगाव, कर्नाटक येथे दिनांक ४ जानेवारी ते ७ जानेवारी या कालावधीत करण्यात आले आहे.**



या स्पर्धे करिता २३ पुरुष संघ – उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, गुजरात, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, केरला, रोलर स्पोर्ट्स आणि सोशल अकॅडमी, दिल्ली, आसाम, गोवा, छत्तीसगड, चंडीगड, पंजाब, कर्नाटका, पोंडीचेरी, तेलंगाना, मध्य प्रदेश, वेस्ट बंगाल, हरयाणा, तामिळनाडू, दिव आणि दमन, आंध्रप्रदेश आणि १५ महिला संघ – उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, गुजरात, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, केरला, आसाम, छत्तीसगड, कर्नाटका, पोंडीचेरी, मध्य प्रदेश, वेस्ट बंगाल, हरयाणा, तामिळनाडू इत्यादी संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र रोल बॉल संघातील खेळाडूंना महाराष्ट्र रोल बॉल संघटनेचे संघटनेचे अध्यक्ष श्री संदीप खर्डेकर व कोथरूड महिला आघाडी अध्यक्ष सौ. अस्मिता करंदीकर, प्रकाशतात्या बालवडकर, लहुजी बालवडकर, सचिव प्रताप पगार यांच्या हस्ते प्लेईंग कीटचे वाटप करण्यात आले.

१९ वी राष्ट्रीय स्पर्धा मागील वर्षी स्पर्धा जम्मू आणि काश्मीर येथे घेण्यात आली होती. या स्पर्धे मध्ये पुरुष गटात उत्तर प्रदेश संघाने विजेतेपद मिळाले होते तर महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद मिळाले होते. महिला गटात विजेता संघ राजस्थान ठरला होता तर उत्तर प्रदेश द्वितीय क्रमांकावर होता.

### महाराष्ट्राचा पुरुष संघ

» निलेश शिंदे संघ नायक अहमदनगर, अमितेश बोदडे – यवतमाळ, रचित वर्मा – ठाणे, राहुल पाटील – नंदुरबार, आदित्य मगदूम- कोल्हापूर, सिद्धार्थ सोनार – कोल्हापूर, सिद्धार्थ बोंबले, रोहन दाभाडे, प्रतीक साठे, मनीष राठोर, मधुसुधन रत्नपारखी, साहिल खेडेकर (सर्व पुणे) मार्गदर्शक प्रभाकर वडवेराव -पुणे, व्यवस्थापक राजेश चौगुले- कोल्हापूर.

**महिला संघ –** श्वेता कदम संघ नायक, रेवती हिंगे, वैष्णवी कुलकर्णी, सुहानी सिंग, सई शिंद्रे, सेजल तोटे, सानिया शेळके, वैभवी कदम (सर्व पुणे) मार्गदर्शक प्रियांक पोळ, व्यवस्थापक शुभांगी कांबळे दोघीही कोल्हापूर.

# लक्ष्मणभाऊंचे रुग्णसेवा व्रत जोपासणार!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा संकल्प

### नवी सांगवी येथे अटल महाआरोग्य विनामूल्य शिबीर

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वारकरी, अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रात कायम पुढाकार घेणाऱ्या लोकनेते आमदार स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी ९ वर्षांपूर्वी अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिराची सुरूवात केली. शहरासह राज्यातील तळागाळातील घटकाची रुग्णसेवा व्हावी, हा यामागील उद्देश्य होता. त्यांनी सुरु केलेली आरोग्यसेवेची परंपरा अखंडित रहावी व प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्यसुविधा उपलब्ध व्हावी, हाच अटल संकल्प घेवून या महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रुग्णसेवेचे व्रत अविरतपणे जोपासणार आहे, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.**

भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने तसेच महाराष्ट्र शासनाचा आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका, प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्रंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि अटल चॅरिटेबल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ ते ७ जानेवारी २०२४ दरम्यान 'अटल विनामुल्य महाआरोग्य शिबिरा'चे आयोजन नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी १० वेळेत या शिबिरात नागरिकांना सहभागी होता येणार आहे. याबाबत जगताप यांनी पत्रकार परिषदेमध्ये सविस्तर माहिती दिली.

यावेळी चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, भाजपा शहर वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस विलास मडेगिरी, नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष तुषार हिंगे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनूप मोरे, दक्षिण भारत आघाडीचे राजेश पिल्ले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांनी ९ वर्षांपूर्वी अटल विनामूल्य आरोग्य शिबीर आयोजित करण्याचा उपक्रम हाती घेतला होता. प्रतिवर्षी लाखो सर्वसामान्य कुटुंबातील गरजू नागरिक या शिबिराचा घेत आहेत. गतवर्षी दि. ३ जानेवारी रोजी लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचे निधन झाले होते. यावर्षी त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त 'अटल विनामूल्य महाआरोग्य शिबीर' चे आयोजन करण्यात आले. आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की, शहराध्यक्ष शंकर जगताप आणि स्व. लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराने या शिबिरासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. रुग्णसेवेचा हा वसा आम्ही जपण्याचा प्रयत्न करीत आहोत.



### महाराष्ट्रातील नामांकीत रुग्णालयांचा समावेश...

शिबिरामध्ये ससून हॉस्पिटल, जिल्हा रुग्णालय, वायसीएम, टाटा मेमोरीअल, मुंबई, कोकिलाबेन धीरुबाई अंबानी हॉस्पिटल, आदित्य बिर्ला, जहांगीर, दिनानाथ मंगेशकर, सह्याद्री, संचेती, पुना हॉस्पिटल, भारती, इन्लॅक्स बुधराणी इन्स्टिट्यूट, एच. व्ही. देसाई, व्हिजन नेक्स्ट फाउंडेशन, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, लोकमान्य, चिंचवड, एम्स हॉस्पिटल, सिंम्बायोसिस युनिव्हर्सिटी हॉस्पिटल, एमआयएमईआर मेडिकल कॉलेज, डॉ. बीएसटीआर हॉस्पिटल, श्रीमती काशीबाई नवले, इंद्रायणी कॅन्सर हॉस्पिटल, रुबी अलकेअर, देवयानी, ओम, श्री हॉस्पिटल क्रिटीकेअर आणि तृमा सेंटर, कोहाकडे, सनराईज, आयुर्वेदिक न्युरो थेरपी, नारायण धाम, नॅशनल आयुष मिशन, स्टर्लिंग, ज्युपिटर, सूर्या मदत अँड चाईल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अशी महाराष्ट्रातील नामांकीत रुग्णालये सहभागी होणार आहेत. शिबिराचा लाभ घेण्यासाठी ओळख व पत्त्याचा पुरावा (आधार कार्ड, मतदान कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा रेशनकार्ड) आणि पूर्वी काही आजार असल्याच त्याचे कागदपत्रे व मेडिकल रिपोर्ट सोबत आणावेत. अधिक माहितीसाठी ९८५०१७११११ आणि ७५७५९८११११ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कॅन्सरसह विविध तपासण्या मोफत...

**शिबिराच्या माध्यमातून कॅन्सर आजाराची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच, एक्स रे, सोनोग्राफी, सर्व रक्त तपासण्या आणि डायलेसीसही मोफत करण्याची सुविधा आहे. दंतरोग तपासणी आणि उपचार यासह हृदयरोग शस्त्रक्रिया व प्रत्यारोपण किडनी, विकास व प्रत्यारोपण, कॉकलर इन्प्लान्ट, लिव्हर प्रत्यारोपण, गुडघे प्रत्यारोपण, हाडांचे व मणक्यांचे आजार, हिप प्रत्यारोपण, कॅन्सर व शस्त्रक्रिया व केमोथेरपी, प्लास्टिक सर्जरी, दंतरोग, नेत्ररोग, बालरोग व शस्त्रक्रिया, मोफत श्रवणयंत्रे, मेंदूची शस्त्रक्रिया, आयुर्वेद उपचार, मुत्र मार्गाचे विकार, त्वचा विकार, फाटलेली टाळू व ओठांवरील शस्त्रक्रिया, बॉडी चेकअप, एपिलीप्सी फिट येणे, कान-नाक-घसा, अनियमित रक्तदाब आणि शुगर तपासणी, दंत चिकित्सा, किशोरवयीन मुलींचे समुपदेशन, गरोदर माता तपासणी, स्त्री रोग, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच सर्व आजारांवर आयुष्यमान भारत व महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया, लहान बालकांच्या हृदयामधील छिद्राची शस्त्रक्रिया, मोफत अँन्जोग्राफी, अपंगांना जयपूर फूट व कॅलीपर्सचे मोफत वाटप, मोफत चष्मे वाटप, आयुर्वेदिक, न्युरोथेरपी, आयुर्वेद, योगा, नॅकोपॅथी, उनानी सिद्धा होमिओपॅथी, कायरोपॅक्ट्रीक थेरपी अशा सुविधा उपलब्ध केल्या आहेत. विशेष म्हणजे, सर्व नागरिकांना या निमित्ताने मोफत औषधे दिली जाणार आहेत.**

### अटल विनामुल्य शिबिराची वैशिष्ट्ये...

शिबिरामध्ये नाव नोंदणीसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन या दोन्ही पद्धती आहेत. सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी यांच्यामार्फत ऑफलाइन नोंदणी करून घेतली जात आहे. त्याबरोबर येणे सोशल मीडिया विविध प्लॅटफॉर्म्स या माध्यमातून देखील ऑनलाईन नोंदणी सुरू आहे. त्याला नागरिकांचा प्रतिसादही मिळत आहे. महाराष्ट्रातील नामांकीत रुग्णालयांची युनिट आणि सुमारे ६०० हून अधिक डॉक्टर्स, तज्ञ व पॅरामेडिकल स्टाफ शिबिरासाठी कार्यरत राहणार आहे. विविध रुग्णालयांचे २७० हून अधिक रोग निदान स्टॉल उभारल्या आहेत. शिबिराच्या माध्यमातून कॅन्सर आजाराची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच, एक्स रे, सोनोग्राफी, सर्व रक्त तपासण्या आणि डायलेसीसही मोफत करण्याची सुविधा आहे. डायलेसीस सायकल पूर्ण करण्यात येणार आहे. रक्त तपासणीचा रिपोर्ट मोबाईलवर पाठवण्याची सुविधा केली आहे.

---

# नाट्य संमेलनात 'बालनगरी'चा किलबिलाट!

## पालक-मुलांना पर्वणी : आयोजक भाऊसाहेब भोईर यांची माहिती

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**१०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन येत्या शनिवारी आणि रविवारी (दि.६ व ७ जानेवारी) चिंचवडगाव येथील श्री मोरया गोसावी क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. या १०० व्या नाट्य संमेलनात प्रथमच लहान मुलांसाठी बालनगरी स्वतंत्रपणे उभारण्यात आली आहे. नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर यांनी स्वतः या बालनगरीच्या उभारणीसाठी लक्ष दिले आहे.**

संमेलनाच्या पूर्वसंध्येसह (दि. ५ जानेवारी) नाट्य संमेलनात दोन्ही दिवस या बालनगरीत लहान मुलांसाठी भरगच्च कार्यक्रम आहेत. बालनाट्य नगरीमधील विविध कार्यक्रमांची निवड प्रकाश पारखी, धनंजय सरदेशपांडे, रुपाली (काठोळे) पाथरे, मयूरी जेजुरीकर, गौरी लोंढे या यांनी केले आहे. ही बालनगरी भोईर नगर येथील मैदानावर असणार आहे.

या विषयी माहिती देताना नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर म्हणाले, आज पर्यंत ९९ नाट्य संमेलन झाली, मात्र यामध्ये लहान मुलांसाठी एखाद दुसरं नाटक किंवा बाल गीतांचा कार्यक्रम व्हायचा. त्यामुळे नाट्य संमेलनात लहान मुलांचा सहभाग हा कमी प्रमाणात दिसायचा. परंतु १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेताना आम्ही जाणीवपूर्वक लहान मुलांसाठी 'बालनगरी' हा एक वेगळा रंगमंच ठेवला आहे. लहान मुलांना बालपणा पासूनच नाटकाची गोडी लागावी, त्यांच्यावर नाटकाचे संस्कार व्हावेत, हा यामागील उद्देश आहे.




### विद्यार्थ्यांनाही निमंत्रण...

पूर्वसंध्येला स्थानिक बाल कलाकारांच्या विविध कार्यक्रमाबरोबरच, सुट्टी गाजवलेले ' बोक्या सांतबंडे' हे व्यावसायिक बालनाट्य, ग्रीप्स थिएटरचे गोष्ट सिंपल पिल्लाची, बालगीते, पपेट शो हे खास मुलांसाठी आकर्षण असणार आहे. तसेच क्लाऊन माईम अ‍ॅक्ट हा प्रकार पिंपरी चिंचवड मध्ये पहिल्यांदाच सादर होणार आहे. हे पाहण्यासाठी मनपा शाळांमधील विद्यार्थी, झोपडपट्टी भागात असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थी यांना आमंत्रीत केले आहे, कारण तिकीट काढून असे कार्यक्रम त्यांना अनुभवता येणार नाहीत. तसेच इतरही लहान मुलं यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत आनंद लुटतील असा विश्वास भोईर यांनी व्यक्त केला.




**भारताने ऑस्ट्रेलियाशी केलेल्या आर्थिक सहकार्य आणि व्यापारविषयक कराराने (ईसीटीए) उभय देशातील आदान-प्रदान, व्यापार, सहकार्य वाढीला चालना मिळाली. त्याचा उभयतांना व्यापक लाभ झाला. त्याच धर्तीवर अन्य देशांशी सहकार्यवृद्धीवर भर दिला जात आहे.**

# सहकार्य भक्कम करणारा करार




भारत ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्य आणि व्यापार करार (इंड-औस ईसीटीए) गेल्या वर्षी अस्तित्वात आला. हा करार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमधील महत्त्वाच्या उपक्रमांसाठी कशी प्रचंड मेहनत घेऊन तसेच सर्व हितसंबंधितांशी सल्लामसलत करून नियोजन केले जाते, याचे उत्तम उदाहरण आहे. अशा उपक्रमांची अंमलबजावणीही प्रभावीपणे केली जाते, जेणेकरून सर्वसामान्य लोक आणि लघु तसेच मध्यम उद्योग अशा दोघांनाही त्याचा लाभ मिळेल. भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील हा करार दोन्ही क्रिकेटप्रेमी देशांना परस्पर लाभदायक ठरला आहे. त्यात अमृतकाळातील आत्मविश्वासपूर्ण आणि महत्वाकांक्षी अशा नव्या भारताविषयीचा जगाचा दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. तसेच, कायद्याचे राज्य आणि साधारण सारखीच कायदेशीर व्यवस्था असलेल्या दोन संसदीय लोकशाहीच्या देशांमधील राजनैतिक भागीदारी या करारामुळे अधिकच दृढ होणार आहे. ही दोन्ही राष्ट्रे, जपान आणि अमेरिकेसोबत 'क्वाड' या संघटनेचे सदस्य आहेत. दोन्ही देश, जपानसोबत, त्रिपक्षीय पुरवठा साखळी लवचिक करण्याविषयीच्या उपक्रमाचा (एससीआरआय) आणि १४ सदस्यीय हिंद-प्रशांत प्रदेश आर्थिक आराखड्याच्याही (आयपीईईफ) भाग आहेत. मुक्त व्यापार करार (एफटीए) या भारताच्या विकसित देशांसोबतच्या पहिल्या करारात प्रचंड क्षमता आहे. भारत ऑस्ट्रेलियाकडून मुख्यत्वे कच्चा माल आणि काही वस्तू आयात करतो; तर तयार मालाची निर्यात करतो. म्हणूनच, 'एफटीए'मुळे भारतीय उद्योजकांचा उत्पादन खर्च कमी होऊन, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही बाजारपेठांत त्यांची उत्पादने अधिक स्पर्धात्मक होऊ शकतील. यामुळे भारतीय स्टार्टअप कंपन्यांनाही स्वतःच्या प्रगतीची संधी मिळेल.

आकडेवारी असे सांगते की, 'भारत-ऑस्ट्रेलिया ईसीटीए'ने अत्यंत सकारात्मक सुरुवात केली आहे. या करारामुळे कामगार प्रणित क्षेत्रांमध्ये लाखो रोजगार निर्माण होतील, हा मोदी सरकारचा विश्वास दृढ झाला आहे. कारण भारतीय उत्पादनांना ऑस्ट्रेलियाच्या बाजारपेठेत शंभर टक्के करमुक्त प्रवेश मिळेल. एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत भारतातून ऑस्ट्रेलियाला झालेल्या व्यापारी निर्यातीत चौदा टक्क्यांची वाढ झाली आहे. सध्याच्या आव्हानात्मक वातावरणात, इतर देशांशी भारताच्या सुरू असलेल्या व्यापाराच्या तुलनेत ही कामगिरी अत्यंत उत्तम आणि सरस होती. ऑस्ट्रेलियाची एकूण निर्यात चार टक्क्यांनी घटली असली तरी भारतातून केल्या जाणाऱ्या खरेदीत मोठी वाढ झाली आहे. ऑस्ट्रेलियातून भारतात होणारी निर्यात १९ टक्क्यांनी घटल्यामुळे दोन्ही देशातील व्यापारी तूट ३९ टक्क्यांनी घटली आहे. प्राधान्यक्रमाच्या लाईन्स अंतर्गत ऑस्ट्रेलियाला होणाऱ्या निर्यातीत रोजगारनिर्मिती क्षेत्रात जोरदार वाढ झाली. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाला अभियांत्रिकी वस्तूंची निर्यात २४% वाढली, तर निर्यातीत केवळ एक टक्का वाढ झाली. 'ईसीटीए'मुळे इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि प्लास्टिकच्या ऑस्ट्रेलियाला निर्यातीत एकूण निर्यातीपेक्षा जास्त सरस कामगिरी झाली आहे. भारत ऑस्ट्रेलियाला सातशेहून अधिक वस्तूंची निर्यात करते. २०२३-२४च्या पहिल्या दहा महिन्यांत ही निर्यात ३३ कोटी पन्नास लाख अमेरिकी डॉलर्स आहे; ज्यात साडेसहा कोटी अमेरिकी डॉलरच्या स्मार्टफोन निर्यातीचा समावेश आहे. इतर नवीन उत्पादनांमध्ये रत्ने आणि दागिने क्षेत्रातील अनेक वस्तू, हलकी तेले, बिगर-औद्योगिक हिरे तसेच रेशमापासून बनवलेल्या वस्त्रांव्यतिरिक्त स्कर्ट आणि कपडे यांचा समावेश आहे. त्याची दखल भागीदार घटकांनी घेतली आहे. भारताने २०४७ पर्यंत विकसित देश बनण्यासाठी कंबर कसली आहे. आपले व्यावसायिक भागीदार ही ताकद लक्षात घेत असून, कृषी आणि दुग्धविकासासारख्या संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करण्याविषयीच्या आमच्या चिंताही त्यांनी लक्षात घेतल्या आहेत.

## संपादकीय »

### जनतेचं ऐकायचं!

***राजकीय वर्गाने आपसात तडजोडी करून सत्तावाटपाचे काही प्रयोग केले; पण त्याची कसोटी अद्याप सर्वसामान्य लोकांपुढे लागलेली नाही.***

शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून राज्यात ट्रिपल इंजिनचे सरकार येऊन सहा महिने लोटल्यानंतरही या राजकीय उलथापालथींचे कवित्व संपलेले नाही. याचे कारण राजकारणी वर्गाने आपसात तडजोडी करून सत्तावाटपाचे काही प्रयोग केले; पण त्याची कसोटी अद्याप सर्वसामान्य लोकांपुढे लागलेली नाही. त्यामुळे आपली भूमिका कशी योग्य हे सांगण्याचा अनेक नेत्यांचा अट्टहास सुरू आहे. अजित पवार यांनी थेट बारामतीत जाऊन केलेला खणखणाट हे त्याचे ताजे उदाहरण. परंतु शरद पवार यांच्यासारख्या मुरब्बी राजकारण्याविरोधात लढतानाचा त्यांचा ताजा दाखला मात्र संदर्भासहित चुकला आहे! शरद पवार यांनी वयाच्या अवघ्या ३८व्या वर्षी बंड केले होते; मग आपण साठाव्या वर्षी ते केले, यात चूक काय, असा अजित पवार यांचा सवाल आहे. मात्र, या दोन्ही बंडांमध्ये थोडेथोडके नव्हे, तर थेट ४५ वर्षांचे अंतर आहे.

**'टूबी ऑर नॉट टू बी' या शेक्सपिअरियन विधानासारखी काहीशी गत जीवाश्म इंधनाची झाली आहे. ऊर्जा उद्योग व या क्षेत्राशी निगडित विविध घटक गेल्या काही वर्षांत परिवर्तनशील स्थितीत आहेत. जीवाश्म इंधनाची नियोजित समाप्ती हा जागतिक पातळीवर विवादाचा व गंभीर विश्लेषणाचा विषय बनला आहे.**

# ऊर्जा संक्रमणासाठी हवे योग्य धोरण

नुकतीच दुबईत पार पडलेली COP २८ ची परिषद काय, ऊसापासून इथेनॉल उत्पादनावर तात्पुरती बंदी घालण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय काय किंवा रण ऑफ कच्छ सौर आणि पवन प्रकल्प काय, एकूणच ऊर्जेचा प्रश्न प्रकाशझोतात आला आहे. जीवाश्म इंधन हा आजच्या आधुनिक, औद्योगिक युगासाठी ऊर्जेचा एक प्रमुख स्त्रोत आहे. तो मानवी जीवनाचा, जागतिक अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. जीवाश्म इंधनावर आधारित जीवनशैलीत बदल घडवून आणणे हे सोपे नाही. परिणामतः हे संक्रमण सोपे असणार नाही. जीवाश्म इंधन - वापराद्वारे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनामुळे होणारे हरितगृह परिणाम आणि हवामान बदल ही वैज्ञानिक वस्तुस्थिती जरी असली तरी, तपशीलात काही मतभेद आहेत. जीवाश्म इंधने ही हवामानबदलाचे दोषी नसून हवामानबदल हा सृष्टीतील एक नैसर्गिक बदल आहे, असे वादाकरिता गृहीत धरले तरीही आपल्या जीवनशैलीत



पर्यायी ऊर्जास्त्रोतांचा समावेश करणे आवश्यक आहे. याचे कारण जीवाश्म इंधने तांत्रिकदृष्ट्या पुनर्नवीकरणाची क्षमता राखत नाहीत. म्हणजेच जीवाश्म इंधनाची उपलब्धी सीमित आहे. कार्बन डायऑक्साईड, मिथेन, व इतर हरितगृह वायूंचे पृथ्वीभोवती आवरण निर्माण झाले आहे, ज्यामुळे जागतिक तापमान वाढून आजची हवामानबदलाची स्थिती निर्माण झाली आहे. निव्वळ शून्य राखण्यासाठी किंवा १.५ अंशांच्या सुरक्षित मर्यादित जागतिक तापमानवाढ स्थिर ठेवण्यासाठी हे कार्बन डायऑक्साईड व इतर हरितगृह आवरण काढून टाकणे अथवा कमी करणे आवश्यक आहे. १९८१मध्ये शास्त्रज्ञांनी ग्लोबल वॉर्मिंगची नोंद घेण्यास सुरुवात केल्यापासून डीकार्बनायझेशनच्या (वातावरणातून कार्बनचे प्रमाण कमी करणे) विविध पद्धती व उपक्रम राबवले गेले आहेत. सुरुवातीस त्यात जंगलतोड कमी करणे, वनीकरण, काही प्रमाणात सौर ऊर्जा व पवन ऊर्जेचा विकास व वापर, इत्यादीसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. तरीही अक्षय ऊर्जेच्या स्त्रोतांचा विकास आणि व्यापक वापर ही डेकार्बनायझेशनच्या उद्दिष्टाच्या दिशेने काम करण्याची सर्वात वास्तविक पद्धत आहे. गेल्या शतकाच्या अंती, सौर व पवन ऊर्जेचा विकास केला गेला. विविध पद्धतीद्वारे डीकार्बनायझेशन वाढवणे, ऊर्जाप्रणालीत अक्षय ऊर्जास्त्रोतांचा समावेश वाढवणे व त्याचबरोबर जीवाश्म इंधनाचा वापर कमी करणे हा ऊर्जा संक्रमणासाठी योग्य रोड मॅप ठरवला गेला आहे. हे उद्दिष्ट समोर ठेऊन आज जगातील ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ व लोकनेते, जीवाश्म इंधनापासून अक्षय्यतेकडे वेगाने बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# श्रीराम मांसाहारी असल्याचे वक्तव्य!

## आव्हाडांविरोधात पवार गट, भाजप आक्रमक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शिर्डीत पक्षाच्या शिबिरात प्रभू श्रीराम (SHRI RAM) मांसाहारी असल्याचे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. आव्हाड यांच्याविरोधात ठाण्यात अजित पवार गट (NCP AJIT PAWAR) आक्रमक झाला आहे. आव्हाड यांच्या निवासस्थानाबाहेर महाआरती करणाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**



तर, भाजप आमदार राम कदम (Ram Kadam) गुरुवारी आव्हाडांविरोधात पोलीस तक्रार करणार आहेत. जितेंद्र आव्हाड यांनी शिर्डी येथील शिबिरात प्रभू श्रीराम हे मांसाहारी असल्याचे वक्तव्य केल्यानंतर ठाण्यातील आव्हाडांच्या घराबाहेर अजित पवार गटाच्या काही कार्यकर्त्यांनी निषेध केला. त्यांनी आव्हाडांच्या घराबाहेर महाआरती करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तात्काळ अटकाव करत त्यांना ताब्यात घेतले. अजित पवार गटाच्या आंदोलनाच्यावेळी अजित पवार गट आणि शरद पवार गटाचे दोन्ही कार्यकर्ते आमने-सामने आले होते अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रभू श्रीराम यांचा हातात फोटो घेऊन आंदोलन केले आहे.दोन्ही पक्षांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी दिल्या आहेत. काही काळ तनावाचे वातावरण निर्माण झाले होते मात्र यानंतर अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांना वर्तक नगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.दरम्यान यावेळी प्रभू श्रीराम यांच्या फोटोची विटंबना झाली असल्याचं शरद पवार गटाचे कार्यकर्ते म्हणाले आहेत. तर, आव्हाड यांच्या विरोधात येत्या 24 तासात गुन्हा दाखल करण्याची मागणी अजित पवार गटाचे नेते आनंद परांजपे केली आहे. गुन्हा दाखल न झाल्यास वर्तक नगर पोलीस ठाण्यात महाआरती करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला. दरम्यान, जितेंद्र आव्हाड यांनी घराबाहेर आंदोलन करणाऱ्या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांवर टीका केली आहे. माझ्या घरावर आता अजित पवार यांच्या चार समर्थकांनी आरती करण्याचा प्रयत्न केला. मोजून चारच जण होते. श्री रामाचा इतिहास माहित नसलेल्यांना इतिहास समजावून सांगावे लागेल, असे आव्हाड यांनी म्हटले. भाजपही आव्हाडांच्या वक्तव्यावर आक्रमक झाली आहे. घाटकोपरचे आमदार राम कदम हे गुरुवारी सकाळी आव्हाडांविरोधात घाटकोपर चिराग नगर पोलीस स्टेशनला तक्रार करण्यासाठी जाणार आहेत. आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. भाजपच्या अध्यात्म आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांनीदेखील आव्हाडांवर टीका केली आहे. रामायणात शूपर्णखादेखील रावणाला सांगते की प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण हे दोघेही कंदमुळे आणि फळ खातात. मात्र, आव्हाड प्रभू श्रीराम मांसाहार करत असल्याचे वक्तव्य करत असल्याची टीका त्यांनी केली. तर, नाशिकच्या काळाराम मंदिराचे पुजारी महंत सुधीरदास पुजारी हे देखील नाशिकच्या पंचवटी पोलिस ठाण्यात सकाळी आव्हाडांविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी जाणार आहेत.तर, भाजप आमदार राम कदम (Ram Kadam) गुरुवारी आव्हाडांविरोधात पोलीस तक्रार करणार आहेत. जितेंद्र आव्हाड यांनी शिर्डी येथील शिबिरात प्रभू श्रीराम हे मांसाहारी असल्याचे वक्तव्य केल्यानंतर ठाण्यातील आव्हाडांच्या घराबाहेर अजित पवार गटाच्या काही कार्यकर्त्यांनी निषेध केला. त्यांनी आव्हाडांच्या घराबाहेर महाआरती करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तात्काळ अटकाव करत त्यांना ताब्यात घेतले.

### श्री राम आईवडिलांना मानायचे

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शिर्डीत पक्षाच्या शिबिरात प्रभू श्रीराम मांसाहारी असल्याचे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. आव्हाड यांच्याविरोधात ठाण्यात अजित पवार गट आक्रमक झाला आहे. आव्हाड यांच्या निवासस्थानाबाहेर महाआरती करणाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अजित पवार गटाच्या आंदोलनाच्यावेळी अजित पवार गट आणि शरद पवार गटाचे दोन्ही कार्यकर्ते आमने-सामने आले होते अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रभू श्रीराम यांचा हातात फोटो घेऊन आंदोलन केले आहे.दोन्ही पक्षांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी दिल्या आहेत.काही काळ तनावाचे वातावरण निर्माण झाले होते मात्र यानंतर अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांना वर्तक नगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.दरम्यान यावेळी प्रभू श्रीराम यांच्या फोटोची विटंबना झाली असल्याचं शरद पवार गटाचे कार्यकर्ते म्हणाले आहेत. तर, आव्हाड यांच्या विरोधात येत्या 24 तासात गुन्हा दाखल करण्याची मागणी अजित पवार गटाचे नेते आनंद परांजपे केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शिर्डीत पक्षाच्या शिबिरात प्रभू श्रीराम मांसाहारी असल्याचे वक्तव्य केले होते.

---

# 10 एकरात सावित्रीबाई फूले यांचे स्मारक उभारणार

## 100 कोटी रुपये खर्चून भव्य स्मारक उभारण्यात येईल : मुख्यमंत्री

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा जोतिराव फुले देशाला वरदान लाभलेले आहेत. त्यांच्यापासून सामाजिक कार्यासाठी प्रेरणा मिळते. साताऱ्यातील नायगाव येथे दहा एकर क्षेत्रात 100 कोटी रुपये खर्चून सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.**

थोर समाजसुधारक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा 193 वा जयंती सोहळा राज्य शासन व सातारा जिल्हा परिषदेच्यावतीने नायगाव (ता. खंडाळा) येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत साजरा झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उत्पादन शुल्क मंत्री तथा साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार महादेव जानकर, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार सर्वश्री मकरंद पाटील, जयकुमार गोरे, महेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.




मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, स्त्री स्वातंत्र्य हा शब्दही माहीत नसलेल्या काळात त्यांनी स्त्री शिक्षणाची क्रांती केली. समाजाला जगण्याची दिशा दिली. अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारे निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन सामाजिक कार्यासाठी ऊर्जा मिळते. माझ्यासाठी ते ऊर्जादायी आहेत. सावित्रीबाई फुले यांचे कर्तृत्व, त्याग, योगदान यांची माहिती समाजातील प्रत्येक घटकाला व्हावी यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील राहील. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या स्त्री शिक्षणाचे चैतन्य आहेत, असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी घेतलेल्या अपार कष्टातूनच महिलांच्या जीवनात शिक्षणाची पहाट निर्माण झाली. त्यातूनच पुरोगामी महाराष्ट्र घडला. आज महिला मुख्य प्रवाहात आल्या आहेत. स्त्री शिक्षणातून महिला अबला नव्हे, तर सबला आहेत ही जाणीव निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. हा इतिहास जतन करणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. साताऱ्यात त्यांचे स्मारक सुस्थितीत आणण्यासाठी शासनाने भरघोस निधी दिला आहे.

### फुले दांपत्य हा आपला अभिमान

नौदलातील युद्धनौकेचे नेतृत्व मराठी महिला करत आहे. त्यांचा आपल्याला अभिमान असून या सर्वांचे मूळ प्रेरणा स्त्रोत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेले काम आहे. सावित्रीबाई नसत्या, तर देश, समाज पन्नास वर्षे मागे गेला असता. शिक्षणाची ज्योत महिलांच्या हाती देऊन समाजाला नवा प्रकाश देण्याचे काम त्यांनी केले आहे. अन्यायाच्या विरोधात उभे राहायचे प्रसंगी अन्याय करणारे आपल्या जवळचे असले तरी त्यांच्या विरोधात बंड करायचे ही शिकवण त्यांनी दिली, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# अनेकवेळा वनवास भोगावा लागतो!

## शिवराज सिंह यांचं दुःख, बंगल्याचं नाव 'मामा का घर'

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**पाचपैकी तीन राज्यांमध्ये सत्ता आल्यानंतर तीनही ठिकाणी भाजपने धक्का देत नवीन मुख्यमंत्री दिले. त्यामुळे शिवराज सिंह चौहान यांचे पाचव्यांदा मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न भंगलं. त्याचं दुःख अजूनही शिवराज सिंह चौहानांना (SHIVRAJ SINGH CHOUHAN) असल्याचं दिसून येतंय. राज्याभिषेक होणार असं वाटत असताना अनेकदा वनवास भोगावा लागतो असं वक्तव्य त्यांनी एका कार्यक्रमात केलं. तसेच आपल्याला मुख्यमंत्री न करण्यामागे काहीतरी मोठा हेतू असेल असंही ते म्हणाले.**

शिवराज सिंह चौहान म्हणाले की, राज्याभिषेक होईल असं वाटत असताना अनेक वेळा वनवास मिळतो. त्यामागेही काही ना काही उद्देश असतो. आताही आपल्याला मुख्यमंत्री न करण्यामागे काहीतरी मोठा हेतू असेल. राजधानी भोपाळमध्ये आयोजित रॅलीदरम्यान माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह म्हणाले की, काळजी करू नका, माझे जीवन जनतेसाठी आहे. यापुढेही राज्यातील जनतेसाठी काम करणार. लोकांच्या जीवनातील दुःख, वेदना दूर व्हाव्यात यासाठीच आपण पृथ्वीवर आलो आहोत. राज्यातील जनतेच्या डोळ्यात कधीच अश्रू येऊ देणार नाही आणि राज्यातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार असल्याचं शिवराज सिंह चौहान म्हणाले. आपण जनतेसाठी अहोरात्र काम करण्यास तयार असल्याचंही ते म्हणाले. आपलेले जीवन जनतेसाठी समर्पित असून आपण सदैव जनतेच्या पाठीशी राहणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. शिवराज सिंह चौहान यांनी रॅलीत आपल्या नवीन बंगल्याचा पत्ता आणि नावही सांगितले. त्यांनी सांगितले की त्यांच्या बंगल्याचा नवीन पत्ता बी-8, 74 असा आहे. त्याचे नाव 'मामा का घर' असं आहे. शिवराज सिंह यांच्या नवीन बंगल्याच्या मुख्य गेटवर एका बाजूला त्यांच्या नावाची पाटी आहे, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या अक्षरात 'मामा का घर' लिहिलेलं आहे. शिवराज सिंह चौहान 2005 मध्ये पहिल्यांदा मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री बनले होते, तेव्हापासून त्यांनी सलग 15 वर्षे राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवले. ते राज्यातील लोकांमध्ये खूप लोकप्रिय होते. विशेषतः त्यांचे महिलांसोबतचे भावा-बहिणीचे नाते असल्यामुळे ते राज्यात मामा म्हणून प्रसिद्ध आहेत.शिवराज सिंह चौहान यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.शिवराज सिंह चौहान म्हणाले की, राज्याभिषेक होईल असं वाटत असताना अनेक वेळा वनवास मिळतो. त्यामागेही काही ना काही उद्देश असतो. आताही आपल्याला मुख्यमंत्री न करण्यामागे काहीतरी मोठा हेतू असेल. राजधानी भोपाळमध्ये आयोजित रॅलीदरम्यान माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह म्हणाले की, काळजी करू नका, माझे जीवन जनतेसाठी आहे. यापुढेही राज्यातील जनतेसाठी काम करणार. लोकांच्या जीवनातील दुःख, वेदना दूर व्हाव्यात यासाठीच आपण पृथ्वीवर आलो आहोत. राज्यातील जनतेच्या डोळ्यात कधीच अश्रू येऊ देणार नाही आणि राज्यातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार असल्याचं शिवराज सिंह चौहान म्हणाले. आपण जनतेसाठी अहोरात्र काम करण्यास तयार असल्याचंही ते म्हणाले. आपलेले जीवन जनतेसाठी समर्पित असून आपण सदैव जनतेच्या पाठीशी

### शिवराज सिंह मामा नावाने प्रसिद्ध

» पाचपैकी तीन राज्यांमध्ये सत्ता आल्यानंतर तीनही ठिकाणी भाजपने धक्का देत नवीन मुख्यमंत्री दिले. त्यामुळे शिवराज सिंह चौहान यांचे पाचव्यांदा मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न भंगलं. त्याचं दुःख अजूनही शिवराज सिंह चौहानांना (SHIVRAJ SINGH CHOUHAN) असल्याचं दिसून येतंय. राज्याभिषेक होणार असं वाटत असताना अनेकदा वनवास भोगावा लागतो असं वक्तव्य त्यांनी एका कार्यक्रमात केलं. तसेच आपल्याला मुख्यमंत्री न करण्यामागे काहीतरी मोठा हेतू असेल असंही ते म्हणाले. शिवराज सिंह चौहान म्हणाले की, राज्याभिषेक होईल असं वाटत असताना अनेक वेळा वनवास मिळतो. त्यामागेही काही ना काही उद्देश असतो. आताही आपल्याला मुख्यमंत्री न करण्यामागे काहीतरी मोठा हेतू असेल. राजधानी भोपाळमध्ये आयोजित रॅलीदरम्यान माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह म्हणाले की, काळजी करू नका, माझे जीवन जनतेसाठी आहे.

# पेट्रोल आणि डिझेल स्वस्त होणार?

## खुद्द पेट्रोलियम मंत्र्यांनी दिलं स्पष्टीकरण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी (HARDEEP SINGH PURI) यांनी बुधवारी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीवर (PETROL DIESEL PRICE) मोठं वक्तव्य केलं आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार लवकरच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात करू शकते, असे सांगण्यात येत असलेल्या बातम्यांवर त्यांनी आपलं मतं व्यक्त केलं आहे. तसेच या संदर्भात ओएमसी आणि सरकारमध्ये बोलणी सुरू असल्याच्या मुद्द्यावर देखील मंत्री हरदीप सिंह पुरी आपलं मत व्यक्त केलं आहे.**

कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्याचा अंदाज अनेक दिवसांपासून वर्तवला जात आहे. डिसेंबर महिन्यात कच्च्या तेलाची सरासरी किंमत प्रति बॅरल 80 डॉलरच्या खाली राहून 75 ते 77 डॉलर प्रति बॅरल दरम्यान राहिली. त्यामुळं देशातील तेल कंपन्यांना मोठा फायदा झाला आहे. त्यामुळं कच्च्या तेलाच्या कमी दराचा फायदा सर्वसामान्यांनाही मिळावा, अशी सरकारची इच्छा आहे. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी याविषयी काय म्हणाले, हे देखील सांगूया? पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितले की, सरकारी तेल कंपन्या इंधनाच्या किंमती कमी करण्याबाबत केंद्र सरकारशी कोणतीही चर्चा करत नाहीत. सर्व मीडिया रिपोर्ट्स केवळ अनुमानांवर आधारित आहेत. त्या बातम्यांमध्ये तथ्य नसल्याची माहिती मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी दिली. अशा कोणत्याही मुद्द्यावर सरकारची तेल कंपन्यांशी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे पेट्रोलियम मंत्र्यांनी स्पष्ट केले. सध्या प्रचंड अशांततेचे वातावरण आहे. जागतील दोन प्रमुख भागांमध्ये संघर्ष सुरु आहे. त्यामुळं कच्च्या तेलाच्या किंमती अस्थिर आहेत. 2024 मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी सोशल मीडियावर पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती कमी झाल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र, पुरी म्हणाले की, इंधनाच्या दरात कपातीचे हे वृत्त दिशाभूल करणारे आहे. याआधी डिसेंबरमध्ये पीटीआय या वृत्तसंस्थेने अर्थ मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा हवाला देत पेट्रोल आणि डिझेलवरील कर कमी करण्याच्या शक्यतेबाबत सांगितले होते. आंतरराष्ट्रीय बाजारात आधीच घसरल्या आहेत. त्यामुळं इंधन उत्पादन शुल्कात कपात करण्याचे कोणतीही शक्यता नाही. पीटीआयने अधिकाऱ्याच्या हवाल्याने सांगितले की, जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती जास्त होत्या तेव्हा आम्ही उत्पादन शुल्क कमी केले.


# हिंडेनबर्गचा तपास एसआयटी, CBI कडे का दिला नाही?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अदानी-हिंडेनबर्ग रिसर्च प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आज निकाल दिला. हे प्रकरण एसआयटी (SIT) किंवा सीबीआयकडे (CBI) वर्ग करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली. त्याऐवजी, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने बाजार नियामक सेबीला अदानी समूहाविरुद्धच्या दोन प्रकरणांचा तपास तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश दिले. न्यायालयाचा निर्णय अहवालांच्या सत्यतेच्या मूल्यांकनावर आणि सेबीच्या अधिकारक्षेत्रावर आधारित आहे. खंडपीठाने OCCRP आणि हिंडेनबर्ग या जॉर्ज सोरोसशी संबंधित संस्थेच्या अहवालांच्या विश्वासार्हतेवर शंका व्यक्त केली आणि म्हटले की आरोपांची स्वतंत्रपणे पडताळणी केली जाऊ शकत नाही आणि ती खरी माहिती मानली जाऊ नये. OCCRP आणि हिंडेनबर्ग रिसर्चच्या अहवालात अदानी समूहावर शेअरच्या किमतीत फेरफार केल्याचा आरोप होता. एवढेच नाही तर एफपीआयशी संबंधित नियमांमध्ये कोणतीही अनियमितता नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. अदानी समूहाने शेअर्सच्या किमती वाढवण्यासाठी या नियमांचा अवलंब केल्याचा आरोप करण्यात आला. हे नियम रद्द करण्यासाठी कोणताही ठोस आधार नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. म्हणजे या नियमांमध्ये कोणताही दोष नाही. याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. प्रशांत भूषण यांनी या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या एसआयटीच्या सदस्यांवर हितसंबंधांच्या संघर्षाचा आरोप केला होता, परंतु न्यायालयाने म्हटले की या दाव्यामध्ये फारसा जोर नसल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले.

# 'हर दिल में उठेगी गुंज, जब बजेगी राम धून'!




प्रसिद्ध दिग्दर्शक रवी जाधव यांच्या मैं अटल हू ची गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा आहे. पंकज त्रिपाठीनं या चित्रपटामध्ये भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची मुख्य भूमिका साकारली असून त्याचे जोरदार कौतुक होताना दिसत असून आता या चित्रपटातील पहिले गाण्याचा टीझर समोर आला आहे. प्रख्यात गायक कैलास खेर यांच्या आवाजातील त्या गाण्याच्या टीझरनं प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. बऱ्याच दिवसांपासून मैं अटल हू हा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असल्याचे दिसून आले आहे. त्यातील अटल बिहारी वाजपेयी यांची भूमिका करणारा पंकज त्रिपाठी हा तर सध्या सोशल मीडियावर नेटकऱ्यांच्या कौतुकाचा विषय आहे. पंकज त्रिपाठीच्या आजवरच्या फिल्मी करिअरमधील सर्वाधिक चर्चेतील चित्रपट म्हणून मैं अटल हू कडे पाहिले जात आहे. त्याविषयी वेगवेगळ्या पोस्ट देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सध्या कैलास खेर यांच्या आवाजातील त्या गाण्याची चर्चा होत आहे. 'हर दिल में उठेगी गुंज, जब बजेगी राम धून'! असे त्या गाण्याचे बोल आहे. आज त्या गाण्याचा टीझर व्हायरल झाला आहे. उद्या (४ जानेवारी) मैं अटल हू मधील पहिले गाणे प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट येत्या १९ जानेवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या गाण्याचे पोस्टर आणि त्या गीताचे बोल पंकज त्रिपाठीनं त्याच्या इंस्टावरुन शेयर केले आहेत. रामधूनचा टीझर व्हायरल झाला आहे.

काही दिवसांपूर्वी मैं अटल हू चा ट्रेलर व्हायरल झाला होता. त्याला नेटकऱ्यांचा, प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

# आमिरची लेक अखेर लग्नबंधनात!





बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान आज लेकीच्या लग्नाच्या बातमीमुळे चर्चेत होता. आज त्याच्या घरी आज उत्सवाचं वातावरण आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ज्या दिवसाची प्रतिक्षा आयरा खान आणि तिचा बॉयफ्रेंड नुपूर शिखरे करत होता तो दिवस आज अखेर आला. आयरा आणि नुपूरने कोर्ट मॅरेज केले आहे. कोर्ट मॅरेज करत दोघांनी लग्नगाठ बांधली. यावेळी आयरा आणि नुपूरसोबत सर्व खान आणि शिखरे कुटूंब उपस्थीत होतं. यावेळी आयरा नववधूच्या रुपात खुपच देखणी दिसत होती मात्र नुपुरच्या लूकने सर्वांचे लक्ष वेधले. नुपुरेने हाफ पँट आणि टी-शर्ट मध्ये आयरासोबत लग्न केलं. नेटकरी त्यांचे कौतुक करत आहे. तर नव्या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव देखील करत आहेत.

आमिर खानच्या लेकीच्या लग्नाला मुकेश अंबानी आणि नीता अंबानी हे दोघेही खास पाहुणे म्हणून उपस्थीत होते. मित्रांसोबत लग्नाची मिरवणूक घेऊन नुपुर ताज लँड्स एंडच्या बाहेर पोहोचला होता. यादरम्यान नुपूर जिमच्या कपड्यांमध्ये धावत किंवा जॉगिंग करत तिथे पोहचला. त्याने ढोल-ताशांच्या तालावर ठेका धरला आणि कुटुंबासोबत भरपूर डान्सही केला. नुपूरचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. काल आयरा खानचे लग्नापुर्वीचे विधी पार पडले होते. सलमान खानच्या घरी आमिरच्या मुलीचा मेहंदी सोहळा पार पडला. तर आमिरच्या पुर्व पत्नीचा मराठमोळा लूकही सोशल मिडियावर व्हायरल झाला होता. कोर्ट मॅरेजनंतर आयरा आणि नुपुर मुंबईतील वांद्रे भागातील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये संध्याकाळी ग्रँड रिसेप्शन पार्टी देणार आहेत. खान आणि शिखरे कुटुंबीय या रिसेप्शन पार्टीला उपस्थित राहणार आहेत. या पार्टीत शाहरुख खानपासून ते सलमान खानपर्यंत सर्व कलाकार उपस्थीत राहण्याची शक्यता आहे. रिसेप्शननंतर आमिरची लेक आणि जावई नुपूर उदयपूरला दुसऱ्या लग्नासाठी रवाना होणार आहे.

# अंकितानं केला मंदिराचा अपमान

टीव्ही मनोरंजन विश्वातील सर्वाधिक बिग बॉस हा शो नेहमीच त्याच्या वेगवेगळ्या कारणांसाठी ओळखला जातो. यंदाचा बिग बॉसचा १७ वा सीझन आहे. त्याची जोरदार चर्चा आहे. यावेळच्या सीझनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांची सोशल मीडियावर हवा आहे. मुनव्वर फारुखीनं गेल्या काही दिवसांपासून त्याच्या नावाची वेगळी क्रेझ तयार केली आहे. बिग बॉसच्या १७ व्या सीझनच्या फिनालेला आता काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्यातून यंदाच्या सीझनमध्ये कोण बाजी मारणार हे चित्र स्पष्ट झाले आहे. मुनव्वर फारुखीची सोशल मीडियावर फॅन फॉलोइंग मोठी आहे. त्याच्या परफॉर्मन्सनं रियॅलिटी शो ची उंची आणखी वाढल्याचे दिसून आले आहे. यात मुनव्वरवर नेटकऱ्यांनी टीका देखील केली आहे. बिग बॉसच्या यंदाच्या सीझनमध्ये अनेकांनी रंग भरले आहेत. त्यात प्रामुख्यानं उल्लेख करायचा झाल्यास विकी जैन, अंकिता लोखंडे, मुनव्वर फारुख, यांची नावं घ्यावी लागतील. टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री अंकिता लोखंडे देखील यंदाच्या सीझनमध्ये चर्चेत आली आहे. तिनं एका विषयावर दिलेली प्रतिक्रिया नेटकऱ्यांच्या संतापाचे कारण ठरली आहे. खरं तर अंकिताचा तो जुना व्हिडिओ आहे. त्यामध्ये तिनं राम मंदिरावरुन दिलेली कमेंट चर्चेचा विषय आहे.

# '12 वी फेल'नं घातला धुमाकूळ!

प्रसिद्ध दिग्दर्शक आणि निर्माते विधू विनोद चोप्रा हे नेहमीच त्यांच्या वेगळ्या कलाकृतींसाठी ओळखले गेलेले सेलिब्रेटी आहेत. त्यांच्या थ्री इडियट्स, परिंदा, मुन्नाभाई एमबीबीएस, सारख्या चित्रपटांना प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. या सगळ्यात चर्चा झाली ती १२ वी फेलमधल्या मनोज कुमारची. विक्रांत मेस्सीनं १२ वी फेलमध्ये मनोज कुमारची साकारलेली भूमिका प्रचंड लोकप्रिय ठरली. त्या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली. त्याचवेळी विविध चित्रपट प्रदर्शित झाले असताना १२ वी फेलला चाहत्यांनी पसंती दर्शवली. या चित्रपटानं बॉक्सऑफिसवर ७० कोटींपेक्षा जास्त कमाई करुन एक वेगळा विक्रम केला. अशातच हा चित्रपट आता डिझ्नी हॉटस्टावर प्रदर्शित झाला आहे.

# सैफ अन् करिनानं विकत घेतला ISPL मधील संघ



बॉलीवूड स्टार सैफ अली खान आणि करीना कपूर खान यांनी आज इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगमधील संघ विकत घेतल्याची घोषणा केली. सैफ आणि करीना जोडीने कोलकाताचा संघ विकत घेतला आहे. या स्पर्धेच्या आयोजकांनी दावा केला आहे की ही भारताची पहिली टेनिस बॉल टी 10 क्रिकेट स्पर्धा असेल जी स्टेडियममध्ये खेळली जाईल. करीना कपूरने आयएसपीएलमधील संघ विकत घेतल्याची घोषणा इन्स्टाग्रामवरून केली. तिने या पोस्टमध्ये लिहिलं की, 'क्रिकेटची परंपरा आपण कायम जपतो. शेवटी हे आमच्या रक्तातच आहे. त्यामुळे इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगमध्ये टीम कोलकाता विकत घेतल्याचे जाहीर करताना आनंद होत आहे. युवा क्रिकेटपटूंना हे एक चांगलं व्यासपीठ असणार आहे. त्यांच्या प्रवासात सहभागी होण्यापेक्षा दुसरा चांगला आनंद नाही.' दरम्यान, आयएसपीएल लीग आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटलं की, 'सैफ अली खानचे वडील मन्सूर अली खान पतौडी हे भारताचे प्रसिद्ध क्रिकेटपटू होते आणि ते भारतीय संघाचे माजी कर्णधार देखील होते. पतौडी कुटुंबियांचे कोलकात्याशी देखील खास कनेक्शन आहे. सैफ अली खानची आई शर्मिला टागोर या देखील कोलकात्याच्या आहेत.' आयएसपीएलमध्ये अनेक सेलिब्रेटींनी संघ विकत घेतले आहेत. अमिताभ बच्चनने मुंबई, अक्षय कुमारने श्रीनगर, ऋतिक रोशनने बंगळुरू, सूर्याने चेन्नई तर राम चरणने हैदराबाद संघ विकत घेतला आहे. आता त्यात सैफ अली खानची देखील भर पडली आहे. बॉलीवूड स्टार सैफ अली खान आणि करीना कपूर खान यांनी आज इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगमधील संघ विकत घेतल्याची घोषणा केली.

# पहिल्याच दिवशी 23 विकेट्स!

## भारताने अवघ्या 11 चेंडूंवर गमावल्या सहा विकेट्स

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**केपटाऊन कसोटीत दक्षिण आफ्रिकेचा संघ २४व्या षटकात बाद झाला. त्यानंतर ३५व्या षटकात भारतीय संघही गडगडला. यजमान दक्षिण आफ्रिकेने केवळ ५५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ १५३ धावांवरच मर्यादित राहिला. भारताकडून विराट कोहलीने सर्वाधिक ४६ धावा केल्या. पण विशेष बाब म्हणजे केवळ ५९ षटकांच्या खेळात २० विकेट्स पडल्या. भारताने आपल्या शेवटच्या ६ विकेट्स केवळ ० धावांवर गमावल्या. ज्यामुळे भारतीय संघाच्या नावावर एका अतिशय लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे.**





भारतीय संघाची धावसंख्या ३३ षटकापर्यंत ४ बाद १५३ धावा होती. विराट कोहली आणि केएल राहुल क्रीजवर होते. भारतीय संघ किमान २५० धावा करेल अशी अपेक्षा होती. पण इथून पुढे जे घडले त्यावर कदाचित कोणाचा विश्वास बसणार नाही. भारतीय संघाची धावसंख्या १५३ च्या पुढे जाऊ शकली नाही आणि संपूर्ण संघ त्याच धावसंख्येवर गडगडला. टीम इंडियाने शेवटच्या ६ विकेट्स अवघ्या ११ चेंडूंवर गमावल्या. अशा प्रकारे भारताने ९८ धावांची आघाडी घेतली. त्याचबरोबर दोन्ही संघांचा पहिला डाव संपला तेव्हा ६० षटकेही झाली नव्हती. काही तासांतच भारतीय गोलंदाज पुन्हा एकदा मैदानात उतरले. लुंगी एनगिडीने ३४व्या षटकात तीन विकेट्स घेतल्या. त्यानंतर रबाडाच्या ३४व्या षटकात अवघ्या पाच चेंडूत तीन विकेट पडल्या. अशाप्रकारे भारतीय संघाचा डाव काही वेळातच कोसळला. विराट कोहलीने सर्वाधिक ४६ धावांचे योगदान दिले. टीम इंडिया १५३ धावांवर गारद झाली. मात्र, या संघाचे शेवटचे सहा फलंदाज या धावसंख्येवर एकही धाव न जोडता बाद झाले. कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच एका संघाच्या ६ विकेट्स एकही धाव न काढता पडल्या आहेत. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्यांदा असे घडले की एका डावात ६ भारतीय फलंदाज शून्यावर बाद झाले. टीम इंडियाने यापूर्वी २०१४ मध्ये मँचेस्टरमध्ये इंग्लंडविरुद्धच्या एका डावात आपले सहा फलंदाज शून्यावर गमावले होते. आता त्यानंतर १० वर्षांनंतर पुन्हा कसोटी क्रिकेटमध्ये भारतासोबत असे घडले. तसे, कसोटी क्रिकेटच्या इतिहासात आठव्यांदा असे घडले जेव्हा एका डावात ६ फलंदाज शून्यावर बाद झाले. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना केपटाऊनमध्ये खेळवला जात आहे. या सामन्यात पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत यजमान संघाने दुसऱ्या डावात ३ बाद ६२ धावा केल्या असून सध्या भारतापेक्षा ३६ धावांनी पिछाडीवर आहे. या सामन्यात पहिल्या दिवशी एकूण २३ विकेट पडल्या, ज्यात भारत आणि दक्षिण आफ्रिका पहिल्या डावात सर्वबाद झाले, तर प्रोटीज संघाने दुसऱ्या डावात ३ विकेट्स गमावल्या. याआधी दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार डीन एल्गरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने लागला नाही आणि संघ पहिल्या डावात केवळ ५५ धावांत गारद झाला. यानंतर टीम इंडिया पहिल्या डावात १५३ धावांवर सर्वबाद झाला आणि ९८ धावांची आघाडी मिळाली. या सामन्याच्या पहिल्या दिवशी दोन्ही संघांचे गोलंदाज पूर्णपणे फलंदाजांवर वर्चस्व गाजवताना दिसले आणि फलंदाज संघर्ष करताना दिसले. दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव ५५ धावांवर आटोपला. या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. मोहम्मद सिराजने सर्वाधिक सहा विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि मुकेश कुमार यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. दक्षिण आफ्रिकेचे दोनच फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. काइल व्हर्नने १५ आणि डेव्हिड बेडिंगहॅमने १२ धावांचे योगदान दिले. याशिवाय एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही.

### कोहलीने केल्या सर्वाधिक 46 धावा

» या सामन्याच्या दुसऱ्या डावात पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत दक्षिण आफ्रिकेने ३ गडी गमावून ६२ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार डीन एल्गरने दुसऱ्या डावात १२ धावा केल्या तर स्टब्सने एक धाव आणि जॉर्जीनेही एक धाव घेतली. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा सलामीवीर एडन मार्करम नाबाद ३६ धावांवर तर डेव्हिड बेडिंगहॅम ७ धावांवर नाबाद होता. भारताकडून पहिल्या दिवशी मुकेश कुमारने दोन तर जसप्रीत बुमराहने एक विकेट घेतली. भारताचा पहिला डाव १५३ धावांवर आटोपला. भारताचे तीनच फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. कर्णधार रोहितने ३९ धावांची खेळी खेळली. शुबमन गिलने ३६ आणि विराट कोहलीने सर्वाधिक ४६ धावा केल्या. या तिघांव्यतिरिक्त फक्त लोकेश राहुलला खाते उघडता आले. त्याने आठ धावा केल्या. यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर, रवींद्र जडेजा, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा आणि मुकेश कुमार यांना खाते उघडता आले नाही. मात्र, मुकेशला एकाही चेंडूचा सामना करावा लागला नाही.

# नासिरच्या या टिप्पणीमुळे सूर्यकुमार यादव भडकणार?

## सूर्यकुमार क्रिकेटमध्ये तोच प्रभाव पाडण्यात अपयशी

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**सूर्यकुमार यादवला ५० षटकांच्या क्रिकेटमध्ये काहीही समजत नाही, मात्र तो टी-२०मध्ये चमकदार खेळ करतो आणि या वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकात त्याच्यावर सर्वांची नजर असेल," असा विश्वास इंग्लंडचा माजी कर्णधार नासिर हुसेन याने व्यक्त केला. एकदिवसीयमध्ये सूर्यकुमार यादवच्या कामगिरीवर त्याने जोरदार टीका देखील केली आहे.**





२०२१मध्ये भारताकडून टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या सूर्यकुमार यादवने आतापर्यंत ६० टी -२० सामन्यांमध्ये ४ शतके आणि १७ अर्धशतके झळकावली आहेत. सूर्यकुमार यादवने २०२२मध्ये आयसीसी टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत प्रथम क्रमांक पटकावला होता. सूर्यकुमार यादव एकदिवसीय क्रिकेटमध्ये तोच प्रभाव पाडण्यात अपयशी ठरला आहे. नासिर हुसेनने आयसीसी क्रमवारीचा हवाला देत टीका केली आहे. तो म्हणाला, "सध्या जगाच्या नजरा टी-२० क्रिकेटमधील सूर्यकुमारवर आहेत. तो चाणाक्ष खेळाडू असून तो गोलंदाजाच्या विचारांशी खेळतो. तो मिस्टर ३६० आहे कारण, तो मैदानाच्या सर्व बाजूंना चौफेर फटके मारतो. मात्र, पन्नास षटकांच्या क्रिकेटमध्ये त्याला याची पुनरावृत्ती करता आलेली नाही. इंग्लंडचा माजी खेळाडू त्याच्यावर टीका करताना म्हणाला की, "तो सनकी क्रिकेटर आहे कारण, एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याला कधी फटके मारायचे आणि कधी मारायचे नाहीत, नेमकं हेच कळत नाही. मात्र, टी-२० क्रिकेटमध्ये, स्कायला नेमके काय, हे माहित असते. टी-२० क्रिकेट आणि स्कायचे कॉम्बिनेशन पाहणे खूप मजेदार आहे. नासिर हुसेन पुढे म्हणाला, "प्रत्येक वेळी त्याला माहित असते की टी-२० क्रिकेटमध्ये कधी आणि कुठे फटके मारायचे आहेत. टी-२० हे एक मजेदार क्रिकेट आहे आणि त्यात सूर्यकुमारची फलंदाजी पाहणे म्हणजे एक मोठी पर्वणी आहे." T20 विश्वचषक जूनमध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणार आहे. नासिर म्हणाला की, "दक्षिण आफ्रिका विजेतेपद जिंकू शकते. मी याबद्दल जास्त विचार केला नाही पण त्यांच्याकडे चांगले खेळाडू आहेत. इंग्लंड सध्याचा चॅम्पियन आहे."

### पंतच्या यशस्वी पुनरागमनाची आशा

» यापूर्वी नासिर हुसेनने भारतीय यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतच्या यशस्वी पुनरागमनाची आशा व्यक्त केली होती. ऋषभ पंत वर्षभरापूर्वी कार अपघातात गंभीर जखमी झाला होता आणि त्यातून तो सावरत आहे. अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी ऋषभ पंत क्रिकेटमध्ये परतण्याची शक्यता आहे.

MahaENews
The fight for truth... the right to democracy!
www.mahaenews.com | THURSDAY, 4th JANUARY 2024 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'Atal Sankalp' for health promotion of Pimpri-Chinchwad citizens

## Three days' free camp at Navi Sangvi

## Initiative by BJP City President Shankar Jagtap

**Pimpri : Representative**

**Following the footsteps and legacy of people's leader of Pimpri-Chinchwad city late Laxman Jagtap's work, facilities like diagnosis and treatment are being provided free of cost to common citizens. BJP City President Shankar Jagtap and MLA Ashwini Jagtap have organized this 'Atal Free Maha Arogya Shibir'.**



The camp will be held for three days from January 5th to January 7th on PWD ground at Navi Sangvi. Various NGOs and organizations including Maharashtra Government Health Department, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pratibha Mahila Pratishthan, Chandrarang Charitable Trust and Atal Charitable Trust have taken the initiative in planning the same.

The public leader himself Laxman Jagtap had taken initiative and had started organizing Atal free health camp 9 years ago. Every year lakhs of needy citizens from poor and deprived families are taking benefits from this camp. Last year on January 3rd, was the day of sad demise of Laxmanbhau Jagtap. This year, 'Atal Free Mahaarogya Shibir' has been organized on the occasion of his first death anniversary.

Sassoon Hospital, District Hospital, YCM, Tata Memorial, Mumbai, Kokilaben Dhirubai Ambani Hospital, Aditya Birla, Jehangir, Dinanath Mangeshkar, Sahyadri, Sancheti, Pune Hospital, Bharti, Inlax Budhrani Institute, H. V. Desai, Vision Next Foundation, Dr. D. Y. Patil Hospital, Lokmanya, Chinchwad, AIIMS Hospital, Symbiosis University Hospital, MIMER Medical College, Dr. BSTR Hospital, Smt. Kashibai Navale, Indrayani Cancer Hospital, Ruby Alcare, Devyani, Om, Shree Hospital Kriticare and Trima Center, Kohakade, Sunrise, Ayurvedic Neuro Therapy, Narayan Dham, National Ayush Mission, Sterling, Jupiter, Surya Aid and Child Super Specialty Hospital are the prestigious hospitals of Maharashtra will be participating in this camp.

To avail the camp, carry proof of identity and residential address (Aadhaar card, voter card, driving license or ration card) and documents and medical report of any previous illness. please contact on the 9850171111 and 7575981111 for more information.

> The public leader who gave the thought that 'serving patients is serving God' through his actions. Laxmanbhau Jagtap started a free health camp for common citizens. Needy citizens from Pune district including Pimpri-Chinchwad and rural areas of Maharashtra got benefited through this camp. More and more citizens should benefit through this camp. A separate arrangement has been made for transporting disabled citizens. Preparations for the camp are in final stages. Citizens should be served..this is our resolution.
> **- Shankar Jagtap,** City President, BJP, Pimpri-Chinchwad.

### Various diagnostic tests including cancer are free...

Free cancer screening will be done during this camp. Also, X-ray, sonography, all types of blood tests and dialysis are also available here free of cost. Including Heart Surgery & Kidney Transplant, Cochlear Implant, Liver Transplant, Knee Transplant, Bone & Spine Disease, Hip Transplant, Cancer & Surgery & Chemotherapy, Plastic Surgery, Dentistry, Ophthalmology, Pediatric & Surgery, Free Hearing Aids, Brain Surgery , Ayurvedic Treatment, Urinary Tract Disorders, Skin Disorders, Cleft Palate and Lip Surgery, Body Checkup, Epilepsy Fit, Ear-Nose-Throat, Irregular Blood Pressure and Sugar Checkup, Teenage Girls Counseling, Checkup for pregnant ladies, Gynecology, Hemoglobin Checkup, Also, free treatment and surgery for eligible beneficiaries under Ayushman Bharat and Mahatma Jyotiba Phule Jan Arogya Yojana, Heart Hole surgery for small children, free angiography, free distribution of Jaipur feet and calipers to the disabled, free glasses distribution, Ayurvedic, Neurotherapy, Ayurveda, Yoga, Nacopathy, Unani Facilities like Siddha Homeopathy, Chiropractic therapy are the medical services to be provided in the camp.